# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 21/06/2023 (बुधवार) सायंकाळ

---

## जबरी संभोग

पो.स्टे. उमरेड :- दिनांक ०१.०२.२०२३ ते दिनांक १५.०२.२०२३ चे २३.०० वा. ते ११.०० वा. चे सुमारास यातील नमुद **आरोपी नामे- अजय विजय हत्तीमारे, वय २१ वर्ष रा. जिवन विकास चौक उमरेड** यातील पिडीत फिर्यादी अल्पवयीन मुलगी ही अनुसुचीत जाती जमातीची आहे असे माहीत असतांना देखील लग्नाचे आमीष दाखवुन तिचे सोबत वारंवार जबरदस्तीने शारीरीक संबंध प्रस्तापीत केले त्यावरुन पिडीता फिर्यादी ही २० आठवडयाची गरोदर राहीली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३७६, ३७६(२) (द) भादंवी ४ पोक्सो ३(१) डब्लु १, ३(१)डब्लु २, ३ (२) पाच कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास श्री. राजा पवार उपविभागीय पोलीस अधिकारी, उमरेड विभाग मो.क्र. ९८२३५५५६२६ हे करीत आहे.

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई

पो.स्टे. भिवापूर :- अंतर्गत भिवापुर राष्ट्रीय महामार्ग येथे दिनांक १९/०६/२०२३ चे २३.०० वा. पासुन ते २०/०६/२०२३ चे ०५.०० वा. दरम्यान पोलीस स्टेशन भिवापूर येथील स्टाफ यांना गुप्त बातमीदारांकडुन माहीती मिळाली की, नमुद घटनास्थळी अवैधरित्या टिप्परच्या साहाय्याने रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त बातमीवरून पोलीस स्टेशन भिवापूर येथील स्टाफने घटनास्थळी जावुन १) पांढऱ्या निळया रंगाचे १० चाकी टिप्पर क्र. एम. एच.-३६/ए.ए.- १२९४ चा चालक **आरोपी नामे- शेख महमुद शेख महबुब वय ३५ वर्षे रा. दहेली वाला हा** टिप्पर मध्ये रेती भरून अंदाजे ०६ ब्रास रेती ५०००/- रू. ब्रास प्रमाणे एकुण किंमती अंदाजे ३००००/- रूपये असा एकुण २०,३०,०००/- रूपयाचा मुद्देमाल तसेच २) वाहन क्र. पांढऱ्या निळया रंगाचे १० चाकी टिप्पर क्र. एम. एच.- ४० बी. एल- ४००६ चा चालक **आरोपी नामे- सहीद अख्तर अब्बास खान, वय ४२ वर्षे, रा. चमके ता. बुरमु जि. राची, राज्य झारखंड हा** टिप्पर मध्ये भरून असलेले अंदाजे ०६ ब्रास रेती ५०००/- रू ब्रास प्रमाणे एकुण किंमती अंदाजे ३००००/- रूपये असा एकुण २०,३०,००० रूपयाचा मुद्देमाल विनापरवाना वाहतुक करतांना मिळुन आले.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी यांचे रीपोर्टवरून पो.स्टे. भिवापूर येथे आरोपीतांविरूद्ध कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला असुन गुन्हयाचा पुढील तपास एएसआय अशोकसिंग ठाकुर मो. नं. ९८२२६४३७७९ हे करीत आहे.

## घरफोडी

**पो.स्टे. रामटेक** :– अंतर्गत ०५ किमी अंतरावर चारगाव कॉलनी येथे दिनांक १९/०६/२०२३ चे १९/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– दुर्गेश दौलत लेंढे, वय ६५ वर्षे, रा. शिवनगर परसोडा ता. रामटेक जि. नागपुर यांचे भावाचे लग्न कामठी येथे असल्याने फिर्यादी पत्नी व मुलगी सोबत दि. १६/०६/२०२३ रोजी सायं. ०६.०० वा. चे दरम्यान घराचे दरावाजा बंद करुन कुलुप लावुन लग्न करिता गेले असता दि. २०/०६/२०२३ रोजी ०८.३० वा. चे दरम्यान घरी शिवनगर परसोडा रामटेक येथे आले असता यातील कोणीतरी अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे दाराचे कुलुप कडीकोंडासह तोंडुन घरात प्रवेश करुन बेडरुम मध्ये ठेवलेली लोखंडी आलमारीचे लॉकर तोडुन त्यात ठेवलेली नगदी ९०००/– रुपये व फिर्यादीचे पत्नीचे वीस वर्षा अगोदर केलेले कानातील ०८ ग्रॅम सोन्याचे वेल किंमती २४०००/–रू. जुने वापरती पावती नसलेले व HMT घडी किंमती १०००/–रू. जुने वापरती असा एकुण ३४०००/– रुपयाचा मुद्देमाल चोरुन नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे रामटेक येथे आरोपीविरूद्ध कलम ४५७, ४५४, ३८० भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ. प्रकाश गेडाम ब. नं. ७५९ मो. क्र. ९०४९६७३८७४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**